महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मुल्यनिर्धारण विभाग
ठाणे शाखा
जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, ३ रा मजला, कोर्ट नाका, ठाणे (प) - ४०० ६०१
ई-मेल adtp.thane@maharashtra.gov.in/adtpthane@gmail.com दूरध्वनी क्रमांक ००२२-२५३४२७४४

जा.क्र. एकात्मिक नगर वसाहत/मौ. अंतर्ली, खोणी व इतर/ दिनांक :- १२/०५/२०२२
सेक्टर "B.D.I.O&P"/ ससंठाणे/ ९३८४

प्रति,

मे. मॅक्रोटेक डेव्हलपर्स लि.,
मुंबई.

**विषय :- बांधकाम परवानगीबाबत (सेक्टर B,D,I,O&P) (पलावा -२)**
मौजे अंतर्ली, खोणी, हेदूटणे, कोळे ता.कल्याण आणि मौजे उंब्रोली, ता. अंबरनाथ तसेच मौजे घारिवली, काटई, कोळे व माणगांव, ता. कल्याण, जि.ठाणे, या एकात्मिक नगर वसाहत मधील मौजे हेदटणे व माणगांव यातील स.न. /गट नं. / सि.स.क्र.१९/२अ, १९/२ब, १९/३ व इतर, एकूण क्षेत्र ३७९०९०७.३८ चौ.मी. यामध्ये बांधकाम परवानगी मिळणेबाबत.

**संदर्भ:-**

१. शासन, नगर विकास विभागाची अधिसूचना (LC) क्र. टिपीएस-१२१३/११६/प्र.क्र.२८९/१३/नवि-१२, दि. ०३.०३.२०१४,
२. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे (LOI) इरादा पत्र क्र.महसूल/कक्ष-१/टे-७/ विनवप्र/ कावि- १५८०२/१४, दि. २५.३.२०१४,
३. नगर विकास विभागाची अधिसूचना (LC) क्र.टिपीएस-१२१३/११६/प्र.क्र.२८९/ १३/ नवि-१२, दि. २२.८.२०१४,
४. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे (LOI) इरादा पत्र क्र. महसूल/कक्ष-१/टे-७/विनवप्र/कावि-४०२२१/१४, दि. १५.९.२०१४,
५. नगर विकास विभागाची अधिसूचना(LC)क्र.टिपीएस-१२१३/११६/ प्र.क्र.२८९/ (ब)१३/नवि-१२, दि. २२/०८/२०१४,
६. नगर विकास विभागाची अधिसूचना(LC)क्र.टिपीएस-१२१४/१६८७/ प्र.क्र.७८/ १५/नवि-१२, दि. ०८/०७/२०१५,
७. अति. महानगर प्रदेश आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे (LOI) इरादा पत्र क्र. SROT/27/Villages/२४०४/STP/LOI/Vill. Hedutane, Umbroli/Vol-I/५३/२०१५, दि. २४/०८/२०१५,

८. अति. महानगर प्रदेश आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे (LOI) इरादा पत्र क्र. SROT/27/Villages/२४०४/STP/ LOI/Vill. Hedutane, Kole/Vol-I/817/2016, दि .२०/०६/२०१६,
९. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे पत्र क्र.महसूल/कक्ष-१/टे-७/अंतर्ली व खोणी/ ता.कल्याण/ विशेष नगर वसाहत प्रकल्प/एसआर-१९/२०१६, दि. २१/०७/२०१६,
१०. नगर विकास विभागाची एकात्मिकृत नगर वसाहतीसाठीची अधिसूचना क्र. टिपीएस-१८१६/प्र.क्र.३६८/१५/२०(४)/नवि-१३, दि. २६/१२/२०१६,
११. नगर विकास विभागाचे निर्देश क्र. टिपीएस – १२१७ / ४३० / प्र. क्र. ६९ / १७ /नवि-१२, दि. २०/०४/२०१७,
१२. जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या (LOI) कार्यालयाचे पत्र क्र. महसूल /कक्ष - १/टे-७/ए.न.व.प्र/ बा.को.नं. F१४९७९५९६२७७९५/१७, दि. २४/०८/२०१७,
१३. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे पत्र क्र. महसूल/कक्ष-१/टे-७/अंतर्ली -खोणी-हेदूटणे-कोळे ता.कल्याण / उंब्रोली ता. अंबरनाथ/एकात्मिक विशेष नगर वसाहत प्रकल्प / रेखांकन / एसआर-२०/२०१८, दि. १४/०६/२०१८,
१४. नगर विकास विभागाचे पत्र क्र. टिपीएस-१२१८/३०८०/प्र.क्र.१५४/ १८/ नवि-१२, दि. ०६.०९.२०१८,
१५. या कार्यालयाचे पत्र क्र. एकात्मिक नगर वसाहत /मौ. अंतर्ली, खोणी व इतर/ ससंठाणे/३१३, दिनांक १६.०२.२०१९,
१६. नगर विकास विभागाची एकात्मिकृत नगर वसाहतीसाठीची अधिसूचना क्र. टिपीएस-१८१६/प्र.क्र.३६८(भाग-१)/१५/३७(१कक)(ग)/वियो/नवि-१३, दि. ०८/०३/२०१९,
१७. या कार्यालयाचे पत्र क्र. एकात्मिक नगर वसाहत /मौ. अंतर्ली, खोणी व इतर/ ससंठाणे/११०२, दिनांक ०४.०७.२०१९,
१८. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे पत्र क्र. महसूल/कक्ष-१/टे-७/अंतर्ली -खोणी-हेदूटणे-कोळे ता.कल्याण / उंब्रोली ता. अंबरनाथ/एकात्मिक विशेष नगर वसाहत प्रकल्प / रेखांकन / एसआर-१८/२०१९, दि. ११/०७/२०१९,
१९. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे अधिसुचना/ (1c) क्र. प्र. यो./मु.म./मौजे हेदुटणे व इतर/ए. न. व प्र. /प्र. क्र. ५७८/१८/टिपीव्ही-३/३६५३, दि. १८/०७/२०१९.
२०. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे पत्र क्र. महसूल/कक्ष-१/टे-७/ए.एन.व. प्र./इरादापत्र/F१५६४०५०९४२६२७/१९, दि. १४/०८/२०१९.
२१. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे पत्र क्र. महसूल/कक्ष-१/टे-७/अंतर्ली -खोणी-हेदूटणे-कोळे ता.कल्याण / उंब्रोली ता. अंबरनाथ/एकात्मिक विशेष नगर वसाहत प्रकल्प / रेखांकन / एसआर-२२/२०१९, दि. २९/०८/२०१९.

२२. शासनाचे पत्र क्र. टिपीएस-१२२१/९९४/प्र.क्र. ९३/२१/नवि-१२,
दि. १८/१०/२०२१.

२३. मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील पत्र क्र. एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प क्र. १ व २ /एकत्रिकरण एसआर-५४/२०२१,
दि. २७/१०/२०२१.

२४. सहसंचालक नगर रचना, कोकण विभाग नवी यांचे पत्र क्र. एकात्मिक नगर वसाहत /मौ.अंतर्ली, खोणी व इतर/ सहंसकोवि/१९८८, दि. ०३/१२/२०२१,

२५. मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे पत्र क्र. महसूल/कक्ष-१/टे-७/अंतर्ली – खोणी- हेदूटणे- कोळे, घारिवली, काटई, माणगांव/ ता.कल्याण / उंब्रोली ता. अंबरनाथ/एकात्मिक विशेष नगर वसाहत प्रकल्प एकत्रीकरणे/ रेखांकन / एसआर-६१/२०२१, दि. ३०/१२/२०२१.

२६. या कार्यालयाचे पत्र क्र. एकात्मिक नगर वसाहत /मौ. अंतर्ली, खोणी व इतर/ ससंठाणे/२२२९, दिनांक २१/१०/२०२१.

२७. या कार्यालयाचे पत्र क्र. एकात्मिक नगर वसाहत /मौ. अंतर्ली, खोणी व इतर/ ससंठाणे/८८ दिनांक १२/०१/२०२२

२८. अर्जदार मे. मॅक्रोटेक ड्वेलर्स प्रा.लि. यांचे या कार्यालयास
दि. ३१/०३/२०२२ रोजीचे पत्र.

महोदय,

विषयांकित मौजे अंतर्ली, खोणी, हेदूटणे, कोळे ता.कल्याण आणि मौजे उंब्रोली, ता. अंबरनाथ तसेच मौजे घारिवली, काटई, कोळे व माणगांव, ता. कल्याण, जि.ठाणे, या एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पास जिल्हाधिकारी, ठाणे यांचे दि. ३०/१२/२०२१ रोजीचे आदेशा अनुसार अंतिम अभिन्यास मंजुरी मिळालेली असून मौजे-हेदूटणे कोळे व मौजे-हेदूटणे उंब्रोली या विशेष नगर वसाहत प्रकल्पास संदर्भाधिन क्र. ५ व ६ अन्वये लोकेशन क्लिअरन्स प्राप्त झाले आहे. मौजे अंतर्ली व खोणी ता. कल्याण येथील विशेष नगर वसाहतीच्या मूळ व वाढीव क्षेत्रास संदर्भाधिन क्र. १ व ३ अन्वये लोकेशन क्लिअरन्स प्राप्त झाले व त्यास मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी अनुक्रमे दि. २५.०३.२०१४ व १५.०९.२०१४ रोजीच्या पत्रान्वये इरादापत्र पारित केलेले आहे. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मौजे हेदूटणे व कोळे ता. कल्याण व मौजे हेदूटणे ता. कल्याण व मौजे उंब्रोली येथील विशेष नगर वसाहतीना अनुक्रमे दि. २०.०६.२०१६ व २४.०८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये इरादापत्र पारित केलेले आहे. तसेच मौजे घारिवली, काटई, कोळे व माणगांव, ता. कल्याण, जि. ठाणे संदर्भाधिन क्र. २२ अन्वये LC व त्यास मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि. २७/१०/२०२१ रोजी पत्रान्वये इरादा पत्र पारित केलेले आहेत.

विषयांकित चारही विशेष वसाहत प्रकल्प शासनाच्या दि. ०८/०३/२०१९ च्या अधिसूचने अनुसार एकात्मिक नगर वसाहती प्रकल्पात एकत्रित करण्यास शासनाने दि. १८/१०/२०२१ च्या पत्रान्वये मान्यता दिलेली आहे व त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी संदर्भाधीन पत्र क्र. २५ अन्वये अंतिम अभिन्यास मंजुरी दिली आहे.

मे. मॅक्रोटेक डेव्हलपर्स प्रा. लि. यांचे सदर एकत्रित नगर वसाहत प्रकल्पाचे नकाशे या कार्यालयास दि. १४.१२.२०२१ च्या पत्रान्वये छाननीसाठी प्राप्त झालेले आहेत. संदर्भित पत्र क्र. २२ अन्वये उपरोक्त चार नगर वसाहतींच्या एकत्रिकरणाबाबतचे निर्देश शासनाने दिलेले आहेत. उक्त क्षेत्रासाठी अंबरनाथ. कुळगाव-बदलापूर व परिसर अधिसूचित क्षेत्राची नियमावली लागू केलेली आहे. सदर मौजे हेदुटणे, घारिवली, काटई, कोळे व माणगांव ही गावे कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेच्या २७ गावांसाठी शासनाने मंजूर केलेल्या विकास योजनेमध्ये समाविष्ट होत असले तरी शासन निर्णय दिनांक २०/०४/२०१७ व दिनांक १८/१०/२०२१ मधील निर्देशात नमूद केलेल्या अट क्र. २ मध्ये सदर जागेस अंबरनाथ,कुळगाव-बदलापूर व परिसर अधिसूचित क्षेत्राची नियमावली लागू राहील व एकात्मिकृत नगर वसाहतीच्या UDCPR-२०२० अनुसार सहायक संचालक, नगररचना, ठाणे यांनी मंजूर अभिन्यासातील ईमारतींच्या बांधकाम नकाशांस परवानगी द्यावी, असे नमूद केले आहे.

प्रस्तावाखालील जागेस पर्यावरण व वन विभागाकडील ना हरकत दाखला दि. १९/६/२०१३ व दि. २१/०२/२०१५ रोजी प्राप्त आहे.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दि. ३०/१२/२०२१ रोजीचे पत्रान्वये एकात्मिकृत नगर वसाहतीच्या रेखांकनास सुधारीत अंतिम मंजुरी दिलेली असून मंजुरी अनुसार प्रस्तावाखालील जागेचा सेक्टर निहाय तपशील खालील प्रमाणे आहे.

| सेक्टर निहाय जागेचे क्षेत्रफळ (चौ. मी. ) | | |
|---|---|---|
| **अ. क्र.** | **सेक्टर** | **क्षेत्रफळ (चौ. मी.)** |
| १ | A | १७९८९३.३३ |
| २ | B | २३६७५०.०० |
| ३ | C | २८३७६१.०० |
| ४ | D | ४१९४९७.३४ |
| ५ | E | १४२५६८.०० |
| ६ | F | २२९१४४.३४ |
| ७ | G | १०७४६३.२७ |
| ८ | H | १०६३८९.३३ |
| ९ | I | २५४४११.७७ |
| १० | J | २०६४०३.९८ |
| ११ | K | १७४७०६.०३ |
| १२ | L | २८९६२८.८१ |
| १३ | M | ९९८८१.०९ |
| १४ | N | १११९९७.०९ |
| १५ | O | १८६१११.४७ |
| १६ | P | ६५१०६७.५३ |
| **एकूण** | | ३७९०९०७.३८ |

तसेच या पूर्वी अर्जदार यांचे जागेवर खाली नमूद केलेल्या सेक्टर क्र. B ते I वरील बांधकामास परवानगी दिलेली असून आता विकासकाने सेक्टर " **B,D,I,O&P** " मध्ये बांधकाम नकाशे सादर केले असून त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | सेक्टर क्र. | बांधकाम परवानगीचा तपशील | सेक्टर निहाय बांधकाम क्षेत्र (चौ. मी.) | सुधारित बांधकाम क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|
| १ | B | एकात्मिक नगर वसाहत /मौ.अंतर्ली, खोणी व इतर/ ससंठाणे /२२२९ दि. २१/१०/२०२१ | २७८४४२.०१ | २८६७०१.०८ (सुधारित) |
| २ | C | एकात्मिक नगर वसाहत /मौ.अंतर्ली, खोणी व इतर/ ससंठाणे /२२२९ दि. २१/१०/२०२१ | ४७५६८६.८७ | ४७५६८६.८७ (कायम) |
| ३ | D | एकात्मिक नगर वसाहत /मौ.अंतर्ली, खोणी व इतर/ ससंठाणे /२२२९ दि. २१/१०/२०२१ | ६०३४२९.६९ | ५८४७७२.६८ (सुधारित) |
| ४ | E | एकात्मिक नगर वसाहत /मौ.अंतर्ली, खोणी व इतर/ ससंठाणे /२२२९ दि. २१/१०/२०२१ | २२९०२८.६३ | २२९०२८.६३ (कायम) |
| ५ | F | एकात्मिक नगर वसाहत /मौ.अंतर्ली, खोणी व इतर/ ससंठाणे /२२२९ दि. २१/१०/२०२१ | ४२०४३९.२९ | ४२०४३९.२९ (कायम) |
| ६ | G (पूर्वीचे सेक्टर E) | एकात्मिक नगर वसाहत /मौ.अंतर्ली, खोणी व इतर/ ससंठाणे /१४९३ दि. ३०/०८/२०१९ | १३१९५५.८५ | १३१९५५.८५ (कायम) |
| ७ | H (पूर्वीचे सेक्टर F) | जिल्हाधिकारी, ठाणे यांचे पत्र क्र.महसूल/कक्ष-१/ टे-७/अंतर्ली व खोणी/ता.कल्याण/ विशेष नगर वसाहत प्रकल्प/ बांधकाम/एसआर-२०/२०१६, दि. २७/१०/२०१६ | १८१२८९.३१ | १८१२८९.३१ (कायम) |
| ८ | I | एकात्मिक नगर वसाहत /मौ.अंतर्ली, खोणी व इतर/ ससंठाणे /२२२९ दि.२१/१०/२०२१ | २५७११२.८३ | २९१५६४.४१ (सुधारित) |
| ९ | K | एकात्मिक नगर वसाहत /मौ.अंतर्ली, खोणी व इतर/ ससंठाणे /११०२ दि. ०४.०७.२०१९ | ८५४.५३ | ८५४.५३ (कायम) |
| १० | O | एकात्मिक नगर वसाहत /मौ.अंतर्ली, खोणी व इतर/ ससंठाणे /८८ दि. १२/०१/२०२२ | ३५४०७०.०१ | ३९२४५७.१६ (सुधारित) |
| ११ | P | नव्याने प्रस्तावित | | २२३२०.९७ |
| | | **एकूण** | २९३२३१९.०२ | ३०१७०७०.८७ |

शासनाने दिलेल्या एकात्मिकृत नगर वसाहतीच्या नियमावली अनुसार विकासकाने सदर रेखांकनातील सेक्टर " B,D,I,O&P " च्या प्रस्तावित बांधकाम नकाशांसाठी या कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावातील इमारतींचा पूर्वीचे कायम ठेवलेल्या मंजूर बांधकाम क्षेत्राचा व सुधारित /नव्याने प्रस्तावित बांधकामाचा इमारतनिहाय तपशील खालील प्रमाणे आहे.

**सेक्टर - B: बांधकाम परवानगीचे क्षेत्र**

| अ. क्र. | इमारत | प्रस्तावित मजले | इमारती उंची (मी.) | इमारती चा वापर | बांधकाम क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | Resarch & Development (Office Building) | तळ + ४ मजले | २५.६० | वाणिज्य | ८२५९.०७ |
| एकूण — | | | | | ८२५९.०७ |

**सेक्टर - D: बांधकाम परवानगीचे क्षेत्र**

| अ. क्र. | इमारत | प्रस्तावित मजले | इमारती उंची (मी.) | इमारती चा वापर | बांधकाम क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ROW HOUSE (158 wings) | तळ + १ मजले | ७.९०८ | रहिवास | ३९५८८.४१ |
| एकूण — | | | | | ३९५८८.४१ |

**सेक्टर - I: बांधकाम परवानगीचे क्षेत्र**

| अ. क्र. | इमारत | प्रस्तावित मजले | इमारती उंची (मी.) | इमारती चा वापर | बांधकाम क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | Cluster no. १०.०१ (B) Wing —H & I | तळ + १२ मजले | ३८.४५ | रहिवास | ९७२६.२६ |
| २. | Cluster no. १०.०३ Wing- A,B,C,D,E& G | तळ + १४ मजले | ४४.१० | रहिवास | ६६२४१.१५ |
| ३. | Cluster no. १०.०३ Shop in Wing- C, D & E | तळ मजला | ३.५० | वाणिज्य | ९४४.४३ |
| एकूण — | | | | | ७६९११.८४ |

**सेक्टर - O: नव्याने बांधकाम परवानगीचे क्षेत्र**

| अ. क्र. | इमारत | प्रस्तावित मजले | इमारती उंची (मी.) | इमारती चा वापर | बांधकाम क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | Cluster १५.०१ Wing A&B | तळ + २३ मजले | ६९.९० | रहिवास | १९८६४.५३ |
| २. | Cluster १५.०२ Wing A,B,C,D,F,G,H & I | तळ + २३ मजले | ६९.९० | रहिवास | ९५६८०.२९ |
| ३. | Cluster १५.०३ Wing | तळ + २३ मजले | ६९.९० | रहिवास | ४५८१८.३२ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | A,B,C & D | | | | |
| ४. | Cluster १५.०४ Wing A,B,C D, E,F,G &H | तळ + २३ मजले | ६९.९० | रहिवास | ७९२०७.७३ |
| ५. | Cluster १५.०५ Wing B,C,D,F,G & H | तळ + २३ मजले | ६९.९० | रहिवास | ७६५९६.४० |
| ६ | Cluster १५.०६ Wing A,B & C | तळ + २३ मजले | ६९.९० | रहिवास | २९८१०.३९ |
| ७ | Cluster १५.०७ Wing A | तळ + २३ मजले | ६९.९० | रहिवास | १५८५९.९८ |
| ८ | Cluster १५.०८ Wing A&B | तळ + २३ मजले | ६९.९० | रहिवास | १९०८७.२२ |
| एकूण — | | | | | ३८१९२४.८६ |

**सेक्टर - P: बांधकाम परवानगीचे क्षेत्र**

| अ. क्र. | इमारत | प्रस्तावित मजले | इमारती उंची (मी.) | इमारती चा वापर | बांधकाम क्षेत्र (चौ. मी.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | Commercial Building | तळ + १० मजले | ३६.९० | वाणिज्य | २२३२०.९७ |
| एकूण — | | | | | २२३२०.९७ |

**एकूण बांधकाम क्षेत्राचा तपशील**

| अ. क्र. | तपशील | चौ. मी. |
|---|---|---|
| १ | जागेचे एकूण क्षेत्र | ३७९०९०७.३८ |
| अ) | बेसिक चटई क्षेत्र निर्देशांक = १ | ३७९०९०७.३८ |
| ब) | अतिरिक्त अनुज्ञेय चटई क्षेत्र (अधिभार आकारुन ) = ०.८० | ३०,३२,७२५.९० |
| क) | एकूण अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र (अ + ब) (Social Housing चे क्षेत्र वगळून) | ६८२३६१३.२८ |
| ड) | Social Housing चे किमान आवश्यक बांधकाम क्षेत्र (ITP च्या नियमाप्रमाणे ) ६०% किमान रहिवास वापराच्या १५% Social Housing | ३,४१,१८१.६६ |
| इ) | एकून अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र (क + ड) (Social Housing च्या क्षेत्रासहित ) | ७१६४८१४.९४ |
| २ | १ ब पैकी अतिरिक्त चटई क्षेत्र (अधिभार आकारलेले ) | ५,६८,८६९.१८ |
| ३ | सद्यस्थितीत एकूण **अनुज्ञेय** बांधकाम क्षेत्र (१अ +२) (Social Housing चे क्षेत्र वगळून ) | ४३५९७७६.५६ |
| ४ | | |
| अ) | अ. क्र. ३ पैकी एकूण प्रस्तावित बांधकाम क्षेत्र Social housing चे क्षेत्र वगळून | २८५७३३८.३९ |
| ब) | Social housing चे प्रस्तावित क्षेत्र | १५९७३२.३९ |

| | | |
|---|---|---|
| ५ | एकूण प्रस्तावित बांधकाम क्षेत्र सेक्टर बी ते सेक्टर ओ (४अ + ४ब) | ३०१७०७१.७८ |
| ६. | एकूण अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रापैकी वापरलेले चटई क्षेत्र निर्देशांक (५/इ) | ०.४२१ |
| ७ | सद्यस्थितीत अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रापैकी एकूण वापरलेले चटई क्षेत्र निर्देशांक (४अ/३) | ०.६५५ |

**भरावयाच्या रक्कमेबाबत :-**

**१) छाननी शुल्क:-**

**(सेक्टर ओ) = रुपये १,७०,२००/-**

**(ब) अतिरिक्त चटई क्षेत्र शुल्क-**

एकात्मिकृत नगर वसाहतीच्या नियमावलीतील विनियम ७.२.२ मधील तक्त्यातील अ. क्र. २ अ अनुसार विकासक यांना ०.८ अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय असून त्यांनी पूर्वीच्या नियमानुसार ०.४ एवढया अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाच्या अनुषंगाने शुल्क मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे रू. ३०,६०,३३,०२०/- भरणा केलेले आहे.

अर्जदार यांनी या प्रस्तावामध्ये मूळ अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांक (FSI) १.०० चा पूर्ण वापर केलेला नाही, त्यामुळे अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकासाठी आवश्यक असलेले अधिमूल्य आकारण्याची आवश्यकता नाही.

**(क) विकास शुल्क-**

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२४ बी मधील तरतुदीअनुसार (परिशिष्ट दोन) बांधकामासाठी विकास शुल्क वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यातील निवासी बांधकाम दराच्या २% व अनिवासी बांधकाम दराच्या ४% या दराने जमा करणे आवश्यक आहे, तसेच एकात्मिकृत नगर वसाहतीच्या सुधारित नियमावलीतील विनियम १३.४ (अ) अनुसार विकास शुल्कामध्ये ५० टक्के सवलत अनुज्ञेय आहे.

परंतु शासनाच्या दिनांक ०६/०९/२०१८ रोजीच्या पत्रानुसार विकासकाने PAID FSI व DOUBLE HEIGHT TERRACE करीता सुमारे रुपये ९,१२,५९,५८७/- एवढी रक्कम समायोजित करण्यासाठी या कार्यालयास कळविलेले होते. त्यानुसार विकासकास एकुण भरणा करावयाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**(ड) एकूण भरावयाची रक्कम**

| अ. क्र. | तपशील | रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | छाननी शुल्क | १,७०,२००/- |
| २ | विकास शुल्क | ३६,१९,३५०/- |
| ३ | अतिरिक्त चटई क्षेत्र शुल्क | निरंक |
| ४ | एकूण आता भरावयाची रक्कम रू. | ३७,८९,५५०/- |
| ५ | शासनाच्या दि. ०६/०९/२०१८ रोजीच्या पत्रानुसार समायोजित करावयाची रक्कम रू. | ९,१२,५९,५८७/- |

| | | |
|---|---|---|
| ६ | या पूर्वी या कार्यालयाने LC करिता दि. १८/०४/२०२२ रोजीच्या पत्राअनुसार समायोजित करावयाची शिल्लक रक्कम रू. | ६,२७,२७,१५५/- |
| ७ | आता समायोजित करावयाची रक्कम रू. (४) | ३७,८९,५५०/- |
| ८ | सदर उपरोक्त प्रस्तावित सेक्टर 'B,D,I,O,P' या सेक्टरच्या बांधकाम परवानगी मंजुरीनंतर समायोजित करण्यासाठी शिल्लक रक्कम रू. (६) - (७) | ५,८९,३७,६०५/- |

**(ई) बँकगॅरंटी**

एकात्मिकृत नगर वसाहत क्षेत्रा मध्ये नियमानुसार सर्व पायाभूत सुविधा प्रकल्प पुर्ण होई पर्यत (Infrastractural Facilities) विकसित करणे व त्याची देखभाल करणे UDCPR 2020 नियमावलीतील विनियम १४.१.१.१२ (viii) नुसार विकासकावर बंधनकारक आहे. तसेच संबंधित एकात्मिकृत नगरवसाहतीतील पायाभूत सुविधांच्या एकूण खर्चाच्या १५% रक्कमेची बँक गॅरंटी विकासकांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिनांक ३०/१२/२०२१ रोजी अंतिम अभिन्यास मंजूर केलेल्या पत्रातील अट क्र. ४६ व मा. सहसंचालक नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांच्या दिनांक ०३/१२/२०२१ च्या शिफारस पत्रातील अट क्र. ६ अ अनुसार विकासकास संबंधित सेक्टरच्या बांधकाम परवानगीच्या वेळेस सेक्टर निहाय बँक गॅरटी देणे आवश्यक आहे. विकासकाने मा. जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयाकडे दि. ०७/०५/२०२२ रोजीच्या पत्रान्वये २६,००,००,०००/- रुपयांची बँक गॅरटी दिलेली आहे व त्याची छायांकित प्रत मा. सहायक संचालक, नगर रचना, ठाणे या कार्यालयास सादर केलेली आहे.

**१) (इ) कामगार उपकर:-**

शासनाच्या एकात्मिकृत नगर वसाहती च्या UDCPR-२०२० नियम क्र. १४.१.१.१३ (IV) अनुसार मुद्राक शुल्क व विकास शुल्कासाठी ५०% सवलत देण्यात आलेली आहे. तथापी या मध्ये कामगार उपकर या बाबीचा समावेश नाही.

प्रस्तावा खालील जागेस सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांचे शिफारस पत्र क्र. एकात्मिकृत नगर वसाहती /मौ.खोणी व अंतर्ली व इतर / सहसंकोवी/१०७२ दि. २८.६.२०१९ व मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कडील बांधकाम परवानगी आदेश क्र. महसूल/कक्ष-१/टे-७/विनवप्र/एसआर-८८-२०१४, दि. १८.९.२०१४ अन्वये सेक्टर- C ते I (पूर्वीचे सेक्टर- A ते G) या २४,८६,३७६.९७ चौ. मी. क्षेत्रावर बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. तसेच वेळो-वेळी सुधारित परवानग्या देण्यात आलेल्या आहेत. आता सेक्टर- B,D,I,O&P, या क्षेत्रावर अर्जदार यांनी नव्याने बांधकाम प्रस्तावित केलेले आहे. अर्जदाराने आतापर्यंत **रू. ९,३०,२६,१७१/-** एवढा उपकर भरणा केलेला आहे. तथापि, सदर उपकर हा प्रस्तावित बांधकाम क्षेत्रावर परिगणित करावयाचा असल्यामुळे **सेक्टर " B,D,I,O&P "** मधील बांधकामाचे कामगार उपकराबाबत नव्याने आदेश निर्गमित करण्यात येतील. तो उपकर विकासकाने पुर्णत्वाचा दाखला घेण्यापुर्वी भरणे आवश्यक आहे. तसेच उपकराच्या रक्कमेबाबत काही तफावत आल्यास ती भरणे विकासकास बंधनकारक आहे.

वर नमूद केल्याप्रमाणे शासनाने दिलेल्या मार्गदर्शनाच्या पार्श्वभूमिवर सेक्टरनिहाय नकाशाची सदर क्षेत्रासाठी लागू असलेल्या एकात्मिकृत नगर वसाहतीच्या नियमावली अनुसार व

अंबरनाथ, कुळगाव-बदलापूर व परिसर क्षेत्राच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीअनुसार तांत्रिक छाननी केली असता सादर केलेले बांधकाम नकाशे नियोजनाच्या दृष्टिने सर्वसाधारणपणे योग्य असल्याने सदर बांधकाम नकाशांना खालील नमूद अटीस अधीन राहून मंजुरी देण्यात येत आहे.

१. सदर प्रकरणी UDCPR-२०२० नुसार एकात्मिक नगर वसाहत प्रकल्पाचे शासन मंजूर विनियम व वेळोवेळी सुधारित करणेत येणाऱ्या सर्व नियमांचे/सूचनांचे पालन करणे विकासकावर बंधनकारक राहील.

२. शासनाच्या दि. ०३/०३/२०१४, दि. २२/०८/२०१४ व दि. ०८/०७/२०१५ च्या अधिसूचनेन्वये प्रदान करण्यात आलेल्या लोकेशनल क्लिअरन्समधील अटी व शर्ती या एकत्रित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पास लागू राहतील.

३. पर्यावरण विभाग महाराष्ट्र शासन यांचे दि. १९/६/२०१३ व दि. २१/०२/२०१५ रोजीच्या ना-हरकत प्रमाणपत्रातील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणे विकासकावर बंधनकारक राहील.

४. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दि. २०/१/२०१४ रोजीच्या मान्यता पत्रातील अटी व शर्तीचे पालन करणे विकासकास बंधनकारक राहील.

५. UDCPR-२०२० नुसार एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पाच्या शासन मंजूर नियमावलीतील विनियम १४.१.१.२ (V) अनुसार वृक्ष लागवड करून त्यांची देखभाल /संवर्धन करणे विकासकावर बंधनकारक आहे.

६. विशेष प्रसंगी जिल्हाधिकारी, ठाणे यांनी लेखी आदेश दिले तर ते विकासकावर बंधनकारक राहतील. त्यास या परवानगीवरून बाधा येणार नाही.

७. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई यांचे दि. ०३/०७/२०१३, दि. ०९/०७/२०१४ व दि. ०६/०२/२०१५ रोजीच्या ना-हरकत प्रमाणपत्रामध्ये नमूद सर्व्हे नंबरच्या जागेमध्ये सेवा सुविधा व्यतिरीक्त कोणतेही बांधकाम करण्यात येऊ नये, त्याचप्रमाणे त्यातील इतर अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

८. संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, मुंबई यांनी दि. ०६.०९.२०१७ व दि. १५/०१/२०२० रोजी प्रमाणित नकाशासह दिलेल्या ना-हरकत दाखल्यातील सर्व अटी / शर्तीचे पालन करणे व पूर्तता करणे विकासकावर बंधनकारक राहील तसेच नव्याने समाविष्ट केलेल्या सेक्टर B,D,I,O & P करीता अग्निशामक विभागाची ना-हरकत प्रमाणपत्र जोता प्रमाणपत्र घेण्यापुर्वी या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील. सदर ना-हरकत प्रमाणपत्राच्या अनुषंगाने जोत्यामध्ये काही बदल झाल्यास त्यास सुधारित परवानगी घेणे बंधनकारक राहील.

९. नकाशातील प्रस्तावित इमारतींकरीता प्रत्येक इमारतींमध्ये नकाशात दर्शविल्या अनुसार १ अग्नी प्रतिबंधक निकास जीन्याचे बांधकाम फायर ॲडव्हायझर यांनी नाहरकत पत्रात दिलेल्या सूचनांअनुसार तसेच योग्य त्या बांधकाम साहित्याचा वापर करुन करणे विकासकावर बंधनकारक राहील. सदर सेक्टरमधील प्रत्येक इमारतींमधील प्रस्तावित रिफ्युज एरिया कोणत्याही परिस्थितीत बंद करता येणार नाही व त्या कायमस्वरुपी खुल्या ठेवणे विकासकावर बंधनकारक राहील. या रिफ्युज एरियाचे भिंतीचे बांधकाम दोन तासाच्या फायर रेटींगप्रमाणे बांधकाम साहित्य वापरुन करणे विकासकावर बंधनकारक राहील.

१०. नकाशांवर दर्शविल्यांप्रमाणेच नियमांअनुसार आवश्यक पार्किंगची सुविधा विकासकाने विकसित करावयाची आहे व तसे विकासकावर बंधनकारक राहील. सदर नकाशामध्ये अनुज्ञेय केलेल्या पार्किंगचा वापर केवळ वाहनतळाकरीता करणे बंधनकारक राहील. सबब, सर्व पार्किंगमध्ये पुरेसा प्रकाश व वायुविजन याची व्यवस्था नैसर्गिकरित्या अथवा आवश्यक असल्यास यांत्रिक पध्दतीने करणे विकासकावर बंधनकारक राहील व यासाठी अखंड वीज पुरवठयासाठी विकासकाने आवश्यक ती सुविधा कायमस्वरुपी उपलब्ध करुन देणे विकासकावर बंधनकारक राहील.

११. नियोजित बांधकामातील सदनिका केवळ रहिवास वापरासाठीच कायमस्वरुपी वापरावयाच्या आहेत. त्यातील वापरामध्ये कोणताही बदल सहायक संचालक, नगररचना, ठाणे यांच्या मंजुरी शिवाय विकासकास / सदनिका धारकास करता येणार नाही.

१२. नकाशामध्ये दर्शविलेले बांधकाम क्षेत्र, भूखंडाच्या हद्दी, सामासिक अंतरे मंजूर नकाशाअनुसार जागेवर चालू असलेले बांधकाम यांची मोजमापे व प्रत्यक्षात जागेवर जुळणे आवश्यक आहे.

१३. सुरक्षिततेच्या दृष्टीने (safety and security of buildings to counter manmade disasters) आवश्यक ती उपाययोजना करणे विकासकावर बंधनकारक राहील.

१४.नकाशे मंजुरीअनुसार च्या इमारतींचे बांधकाम भूकंप प्रतिरोधकाचे (Earthquake) दृष्टीने व Natural Calamities च्या दृष्टीने उपाययोजना करणे व इमारतीचे तसे स्ट्रक्चरल डिझाईन विकासकाच्या संबंधित सल्लागार यांचेकडून करुन घेणे व त्यानंतर प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करणे व त्यांचे सल्ल्याने व देखरेखीखाली बांधकाम करणे विकासकावर बंधनकारक राहील.

१५.UDCPR-२०२० नुसार एकात्मिकृत नगर वसाहत विकसित करणेकामी शासन मंजूर विनियमामधील 'विनियम १४.१.१.९ (III)' अनुसार EWS/LIG बाबतच्या तरतुदींची पूर्तता करणे विकासकावर बंधनकारक राहील.

१६. प्रस्तावित नकाशावर दर्शविल्यापमाणे सर्व सामासिक अंतरे प्रत्यक्षात जागेवर असले पाहिजेत व त्या खालील जागा कायमस्वरुपी खुली ठेवणे बंधनकारक राहील.

१७.क्लब हाऊसची सुविधा टाऊनशिपमधील सर्व रहिवाशांना उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

१८.Rain Water Harvesting System व Solar System ची व्यवस्था व त्यातील इतर तांत्रिक बाबींकरिताची पूर्तता व विकास भोगवटा दाखल्यापूर्वी करणे विकासकांवर बंधनकारक राहील.

१९. बृहत आराखड्यामध्ये ज्या वापरासाठी भूखंड / सेक्टर / ब्लॉक दर्शविला आहे, निव्वळ त्याच वापरासाठी त्या क्षेत्राचा वापर करणे विकासकावर बंधनकारक राहील. रहिवास विभागातील सेक्टर / ब्लॉक मधील भूखंड सदर क्षेत्रास लागू विकास नियंत्रण नियमावलीअनुसार अनुज्ञेय होणा-या रहिवास वापरासाठीच वापरावयाचे आहेत. त्यासह सुविधा, ॲमिनिटी इत्यादी स्वरुपातील मिश्र वापर त्यामध्ये अनुज्ञेय राहतील. कारण UDCPR-२०२० नुसार एकात्मिकृत नगर वसाहतीच्या नियमावलीतील विनियम १४.१.१.७ (IV) अनुसार योजना क्षेत्रात अनुज्ञेय

Total Basic Floor Area (F.S.I.) च्या किमान ६०% Floor area (F.S.I.) हा फक्त निव्वळ निवासी कारणासाठी वापर करणे बंधनकारक आहे.

२०. प्रकल्प राबविताना उद्‌भवणाऱ्या कोणत्याही अडचणी अथवा प्रश्नांसाठी विकासक सर्वस्वी जबाबदार राहील. या अडचणींचे निराकरण करून देण्याची जबाबदारी अथवा बंधन शासनावर, या कार्यालयावर व तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांचेवर असणार नाही.

२१. ITP चा विकास त्या परिसरात सुयोग्य ठिकाणी शासनाच्या संबंधित विभागाच्या सल्ल्याने विकासकास करणे बंधनकारक राहील. Sewage Treatment Plant, Solid Waste Composting Plant, Land Fill Site चे स्थानाबाबत व अन्य सविस्तर तांत्रिक बाबी अनुषंगाने संबंधितांच्या सल्ल्याने विकसित करणे बंधनकारक राहील.

२२. प्रस्तावित जमीन वापर नकाशा सुधारित मंजुरीअनुसार Water Distribution layout ची आखणी करुन घेणे, पाणी पुरवठ्याच्या रेखांकनाची तसेच Reservoir, rain water harvesting system, recycling system व त्यातील इतर तांत्रिक बाबींकरिताची छाननी शासनाच्या संबंधित विभागाकडून करुन घेणे आवश्यक राहील व त्याअनुसार Water Distribution Lines टाकणे वा त्यानुषंगाने इतर विकास करणे विकासकावर बंधनकारक राहील.

२३. बृहत आराखडा मंजुरीनंतर Drainage layout तयार करुन घेणे व त्याची छाननी शासनाच्या संबंधित विभागाकडून करुन घेणे आवश्यक राहील व त्याअनुसार Drainage Lines टाकणे वा त्यानुषंगाने इतर विकास करणे बंधनकारक राहील.

२४. बृहत आराखडयामध्ये दर्शविण्यात आलेल्या सार्वजनिक उपयुक्तता (Public Utilities) चा विकास संबंधित विभागाच्या सल्याअनुसार करणे विकासकास बंधनकारक राहील व त्यानुषंगाने सार्वजनिक उपयुक्ततेच्या स्थानामध्ये व क्षेत्रामध्ये बदल करणे आवश्यक असल्यास त्याप्रमाणे रेखांकन सुधारित करणे विकासकावर बंधनकारक राहील.

२५. प्रकल्पाबाबत कोणतीही जाहिरात करतेवेळी जाहिरातीमध्ये मंजूर रेखांकन व बांधकाम परवानगी प्रमाणेच तपशील / नकाशे इत्यादीचा समावेश करणे विकासकावर बंधनकारक राहील.

२६. प्रस्तावित एकात्मिकृत नगर वसाहतीच्या क्षेत्रातील नैसर्गिक ओढे, नाले, तळी, कॅनॉल व त्यातील वाहणारे पाणी यावर विकासकास हक्क सांगता येणार नाही व त्याच्या नैसर्गिक प्रवाहास अडथळा करता येणार नाही.

२७. एकात्मिकृतनगर वसाहतीच्या नियमावलीतील विनियम १०.५ अ अनुसार ९० लीटर प्रति व्यक्ती पिण्याच्या पाण्याची व अग्निशमन यंत्रणेकरीता आवश्यक पाणी व बागबगीच्या वापराकरिता अतिरिक्त पाण्याची तरतूद विकासकाने करणे आवश्यक आहे. त्याअनुसार विकासकास महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने त्यांच्या दि. १७/५/२०१३ च्या पत्रान्वये १० दश लक्ष घनलिटर प्रतिदिन पाणी पुरवठयास संमती दर्शविली आहे. त्याचप्रमाणे जलसंपदा विभागाने त्यांच्या प्रस्तावित कुशीवली, ता. अंबरनाथ येथील लघु पाटबंधारे प्रकल्पातून ८ दश लक्ष घन मिटर प्रतिवर्षी पाणी देण्याचे दि. २९/११/२०१३ च्या सामंजस्य कराराने (M.O.U.)

मान्य केले आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेशा पाण्याची तरतूद करण्याची जबाबदारी विकासकावर राहिल.

२८. एकात्मिकृत नगर वसाहतीच्या सुधारित नियमावलीतील विनियम १०.५(क) अअनुसार पुरेशा वीज पुरवठ्याची सोय उपलब्ध करणे विकासकावर बंधनकारक आहे. त्याअनुसार (M.S.E.D.C.L.) कल्याण यांनी दिनांक २५/०२/२०१४ व ०५/०८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये संमती दर्शविली आहे.

२९. प्रस्तावित एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्प हा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रस्तावित जागेपासूनच्या १८.३० कि. मी. परिघामध्ये तसेच मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जागेपासून २७.१० कि.मी. परिघामध्ये येत असल्याचे विकासकाने सादर केलेल्या गुगल मॅप स्थानदर्शक नकाशावरुन दिसून येत आहे. याबाबत सदर क्षेत्रासाठी प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीअनुसार विकासकाने विमानतळाजवळील इमारतीसाठी विमानतळ प्राधिकणाचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. त्याअनुसार विकासकाने विमानतळ प्राधिकरणाचे १६० मी. पर्यंत उंचीच्या इमारतीबाबत ना-हरकत प्रमाणपत्र सादर केले आहे. याबाबत भारतीय विमान पत्तन प्राधिकरण (पश्चिम क्षेत्र मुख्यालय) यांची ना-हरकत पत्र क्र.बीटी-१-एनओसीसी/ सीएस/एमयुएम/१४/नोकास/एनएम/ २४६/१४२८/ १२६५-६८, दि. ११/८/२०१४ व बीटी-१-एनओसीसी/ सीएस/एमयुएम/१४/नोकास/ एनएम/२४८/१४३०/१२७३-७६, दि. ११/८/२०१४ यातील सर्व अटी व शर्ती विकासकावर बंधनकारक राहतील.

३०. एकात्मिकृतनगर वसाहत नियमावलीतील टाऊनशिपसाठी अनुज्ञेय असलेल्या एकूण चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेतच संपूर्ण टाऊनशिपचे बांधकाम करता येईल.

३१. अर्जदार यांनी जागेवर बांधकाम सुरु करण्यापूर्वी अग्निशमन विभागाकडील सुधारित ना-हरकत प्रमाणपत्र / दाखला सादर करणे आवश्यक आहे.

३२. विनियम ७.३ (अ) अअनुसार प्रकल्प क्षेत्रात प्रस्तावित पार्क/गार्डन/खेळाचे मैदान हे क्षेत्र नियमाअनुसार विकसित करून सर्वसामान्य जनतेकरिता वापरासाठी अडथळाविना खुले ठेवणे विकासकावर बंधनकारक राहील.

३३. एकात्मिकृतनगर वसाहतीसाठी शासनाने दि. २६/१२/२०१६ रोजी मंजूर केलेल्या नियमावलीतील विनियम १२.८ मध्ये Infrastructural facilities बाबत तरतुदी असून त्याअनुसार प्रकल्प पूर्ण होईपर्यंत व अर्बन लोकल बॉडी स्थापनेपर्यंत Infrastructural facilities पुरविणे व सुस्थितीत ठेवणे व देखभाल करणे विकासकावर बंधनकारक राहील.

३४. Social Housing (EWS/LIG) अंतर्गत विकासकास आवश्यक सदनिकांची यादी म्हाडास सोडत पद्धतीने वाटप करावयाची असून काही सदनिका ह्या विकासकास भाडेतत्वावरील घरांसाठी व विक्रीसाठी स्वतःकडे राखून ठेवायच्या आहेत. त्याअनुसार अर्जदार विकासकास मंजूर रेखांकना अनुसार ३४११८१.६६ चौ. मी क्षेत्र Social Housing (EWS/LIG) साठी राखून ठेवायचे असून त्यापैंकी अर्जदार यांनी 'सेक्टर I' मध्ये १५९७३२.३९ चौ. मी. क्षेत्र प्रस्तावित केले आहे. विकासकास उर्वरित १,८१,४४९.२७ चौ. मी. क्षेत्र पुढील बांधकामात देणे बंधनकारक राहील. तसेच विकासकास एकात्मिकृतनगर वसाहतीसाठी शासनाने

दि. २६/१२/२०१६ रोजी मंजूर केलेल्या नियमावलीतील विनियम ९ मधील ९.१ ते ९.१० अअनुसार Social Housing (EWS/LIG) बाबतच्या आवश्यक तरतुदींची पूर्तता करणे विकासकावर बंधनकारक राहील.

३५. एकात्मिकृत नगर वसाहत क्षेत्रामध्ये नियमानुसार सर्व पायाभूत सुविधा (INFRASTRUCTURE FACILITIES) विकसित करणे वा देखभाल करणेकरीता UDCPR-२०२० मधील नियम क्र. १४.१.१.१२ (VIII) नुसार विकासकावर बंधनकारक आहे. त्यासाठी संबंधित पायाभूत सुविधांच्या एकुण खर्चाच्या १५% रक्कमेची बँक गॅरटी विकासकाने जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे जोतेप्रमाणपत्र घेणेपुर्वी सादर करणे आवश्यक आहे.

३६. विकासकास सदर प्रकल्पातील Social Housing (EWS/LIG) चे क्षेत्र हे विक्री करावयाच्या सदनिकांच्या प्रमाणात बांधणे व विक्री करावयाच्या इमारतींचे भोगवटा प्रमाणपत्र घेणेपूर्वी Social Housing (EWS/LIG) इमारतींचे भोगवटा प्रमाणपत्र घेणे बंधनकारक राहील.

३७. विकासक व त्यांचे वास्तूविशारद यांनी सादर केलेल्या विहित नमुन्यातील माहितीच्या आधारे सदर प्रकरणांची छाननी करण्यात आलेली असून त्यामध्ये चटई क्षेत्र निर्देशांकाच्या परिगणनेबाबत काही तफावत आढळून आल्यास त्यास संबंधित वास्तुविशारद जबाबदार राहील व त्याअनुसार होणाऱ्या तफावतीची सुधारणा अनुज्ञेय चटई क्षेत्र निर्देशांकाच्या मर्यादेत करणे विकासकावर बंधनकारक राहील.

३८. अर्जदार विकासकाने सादर केलेली कोणतीही माहिती व कागदपत्रे ही चुकीची / दिशाभूल करणारी आढळल्यास प्रस्तुतची शिफारस रद्द समजणेत येईल व त्यामुळे विकासकाच्या व इतर सर्व संबंधितांच्या कोणत्याही नुकसानीस स्वतः विकासक जबाबदार राहील.

३९. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे छाननी शुल्क (रु. १,७०,२००/-) व अधिमूल्य शुल्क (रु. ३६,१९,३५०/-) समायोजित केलेली आहे.

४०. या प्रकल्पातील सर्व इमारतींच्या आतील बाजूस तसेच इमारतीसमोरील रस्त्याचे सी. सी. टी. व्ही. चित्रिकरण करण्यासाठी बांधकामाच्या ठिकाणी सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणे विकासकास बंधनकारक राहील.

४१. अर्जदार यांनी खुली जागा १०० KV विद्युत वाहिनी खाली प्रस्तावित केलेला आहे. तथापि प्रस्तावित बांधकामाबाबत संबंधित विभागाचा (MAHATRANSCO) सुरक्षित अंतराचा दाखला घेणे अर्जदार यांच्यावर बंधनकारक राहील. तसेच सदर विद्युतवाहिनी खालील जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम अर्जदार / सदनिका धारक यांस भविष्यात देखील करता येणार नाही.

**सोबतः** मंजूर नकाशांचा संच

**आपला,**

**(किशोर पाटील)**
**सहायक संचालक, नगर रचना,**
**ठाणे**

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर-**

मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे, मुंबई.